## नि.दि.मु.क्र.५४/२०१७ मधील निशाणी ६५ वरील आदेश

**(जयचंद्र सापळे वि. अनवर बागवान)**

**सीएनआर क्र. एमएचएसआय०५–०००२८९२०१७**

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यात व दावा रजिस्टरमध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुतअर्जाचे कामी वादी यांचे कथन असे की, प्रस्तुतकामी वादी व प्रतिवादी यांचा तोंडी पुरावा पुर्ण होऊन दावा युक्तीवादाकरीता नेमण्यात आलेला आहे. परंतु वादीस नवीन दुकान गाळयाची (वेंगुर्ले नगरपरिषद घर नं. १९२/६, वॉर्ड नं. १) त्याच्या ''जयंत स्टोअर्स'' या नावाने चालू असलेल्या धंद्यासाठी वाजवी व प्रामाणिक कारणासाठी नितांत आवश्यकता आहे. सदर गाळ्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही रस्त्यास दर्शनी असलेला गाळा वादीस उपलब्ध नाही. सदर गाळयाच्या मागील बाजूस एकूण ५ गाळे असून ते मुख्य रस्त्यावरुन दिसत नाहीत. तसेच 'जयंत स्टोअर्स' मागील गाळा नं. १ (वेंगुर्ले नगरपरिषद घर नं. १९२/१, वॉर्ड नं. १) हा वादी दुकानाचे सामान ठेवण्यासाठी वापरतो व त्यापुढील गाळ नं. २ (वेंगुर्ले नगरपरिषद घर नं. १९२/२, वॉर्ड नं. १) हा गावडे नावाच्या व्यक्तीस वादीने त्याला पैशाची गरज भासल्यामुळे विकलेला आहे. सदर दोन्ही गाळ्यांच्या पुढील दोन गाळे नं. ३ (वेंगुर्ले नगरपरिषद घर नं. १९२/३, वॉर्ड नं. १) व ४ (वेंगुर्ले नगरपरिषद घर नं. १९२/४, वॉर्ड नं. १) हे वादीने त्याला पैशाची गरज भासल्यामुळे आपली मुलगी सौ. नेहा पडते हिस विक्रीत दिलेले आहेत. तसेच गाळा नं. ५ (वेंगुर्ले नगरपरिषद घर नं. १९२, वॉर्ड नं. १) हा मूळ देवघर म्हणून वापरण्यामध्ये असून श्री देव विठ्ठलाची पालखी त्याच भागात गेली कित्येक वर्षे येण्याची प्रथा आहे. अशा परिस्थितीत 'जयंत स्टोअर्स' (वेंगुर्ले नगरपरिषद घर नं. १९२/५, वॉर्ड नं. १) या गाळयात चालू असलेला धंदा वृध्दिंगत /वाढ होण्याच्या दृष्टीने नवीन दुकान गाळ्याची (वेंगुर्ले नगरपरिषद घर नं. १९२/६, वॉर्ड नं.

१) वाजवी व प्रमाणिक कारणासाठी/गरजेसाठी वादीस आवश्यकता आहे, परंतु तसा उल्लेख दाव्यात करावयाचा राहून गेला. त्यामुळे दाव्यातील परिच्छेद ७अ) च्या शेवटी अर्जात नमूद केल्याप्रमाणे जादा मजकूर लिहिण्यात यावा व तशी दुरुस्ती दाव्यात व दाव्याच्या रजिस्टर मध्ये करुन घेण्यात यावी अशी विनंती प्रस्तुत अर्जान्वये त्यांनी केली आहे.

३. प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी यांनी निशाणी ६८ येथे त्यांचे म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की वादी यांचा सदर अर्ज खोडसाळ व बेकायदेशीर असून सदर दुरुस्ती मंजूर झाल्यास दाव्याच्या मूळ स्वरुपात बदल होणारा आहे. तसेच अर्जात नमूद कारण अवाजवी असून वादी दाव्यात मागत असलेल्या दुरुस्तीचा विचार करता सदरची बाब ही दावा दाखल करण्यापुर्वी वादीस माहीत होती हे स्पष्ट होते. त्यामुळे वादी मागात असलेली दुरुस्ती ही मुदत बाह्य आहे. सबब अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

४. प्रस्तुतकामी उभयपक्षकारांच्या विधीज्ञांचे युक्तिवाद ऐकले. अभिलेखाचे अवलोकन केले. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा वाद मिळकत दुकान गाळा (वेंगुर्ले नगरपरिषद घर नं. १९२/६, वॉर्ड नं. १) याच्या कब्जा परत मिळणेकरीता दाखल केलेला आहे. वादी यांनी प्रस्तुत अर्जान्वये वाद मिळकत दुकान गाळयाची त्यांना प्रामाणिक गरजेपोटी आवश्यकता असल्याबाबतचे स्पष्टीकरण दाव्यामध्ये समाविष्ट करु इच्छीतात. तसेच वादी हे सदर अर्जाच्या अनुषंगाने त्यांना वाद मिळकतीची कोणत्या कारणास्तव गरज आहे याचे स्पष्टीकरण सदर अर्जान्वये दाव्यामध्ये समाविष्ट करणार असल्यामुळे प्रतिवादी यांच्या म्हणण्यातील कथनानुसार प्रस्तुत दाव्याच्या मूळ स्वरुपामध्ये कोणताही बदल होत नाही. वादी यांचा सदरचा अर्ज मंजूर केल्यास भविष्यातील दाव्याची गुंतागूंत कमी होणार असून दोन्ही पक्षकारांमधील सर्व वाद हे एकाच दाव्यामध्ये गुणदोषावर न्यायनिर्णीत होणार आहेत. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्त्वानुसार दाव्याचा निकाल गुणवत्तेवर अंतिमरित्या लावण्याकरीता वादी यांनी

प्रस्तुत अर्जान्वये केलेली मागणी मंजूर करणे न्यायोचित आहे. परंतु वादी यांनी दाव्याच्या अंतिम टप्प्यावर दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रस्तुतकामी दावा निर्णित करण्याकरीता विलंब झालेला आहे. सदर विलंब वादीचा अर्ज मंजूर करतेवेळी लक्षात घेणे देखील क्रमप्राप्त आहे. त्यामुळे सदर विलंबाकरीता वादी यांच्यावर खर्च बसविणे देखील नैसर्गिक न्यायतत्त्वानुसार न्यायोचित होणार आहे. सबब, पुढील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वादी यांचा नि. ६५ कडील अर्ज त्यांनी प्रतिवादी यांना रक्कम रुपये २०००/- खर्च देण्याच्या अटीवर मंजूर करणेत येतो.

२. वादी यांनी या आदेशाचे तारखेपासून एक महिन्याच्या आत दाव्यामध्ये व दावा रजिस्टरमध्ये दुरुस्ती करून त्याच दिवशी दाव्याची दुरूस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी.

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात घोषीत केला.)

SOURABH JAYKUMAR CHIVATE
Digitally signed by SOURABH JAYKUMAR CHIVATE
Date: 2025.07.08 16:32:34 +0530

दि. २६/०६/२०२५ (एस.जे.चिवटे)

वेंगुर्ला दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर वेंगुर्ला